ePaper

**...तर एकही जागा न मागता एनडीएला पाठिंबा देऊ": बच्चू कडू**



| वर्ष - 7 । अंक - 111 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- गायकवाडने केले रिंकूचे कौतुक
- जॅकलिनने तिरंगा फडकवला
- बहुपत्नित्वावर बंदीची शक्यता
- निर्णय अपेक्षा पूर्ण करणारा नाही

www.mahaenews.com | बुधवार , दिनांक 23 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पवना धरण 100 टक्के भरले

# पिंपरी-चिंचवडकरांची चिंता मिटली!

### »पिण्याच्या पाण्याचा साठा मुबलक : आता नियमित पाणी पुरवठ्याची प्रतीक्षा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरासह मावळ मावळवासियांची तहान भागविणारे पवना धरण आज मंगळवारी (दि.२२) सायंकाळी चारपर्यंत १०० टक्के भरले आहे. त्यामुळे वर्षभराच्या पाण्याची चिंता मिटली आहे.**



यंदा मौसमात पावसाने उशिरा हजेरी लावली. जून महिना कोरडा गेल्यांतर जुलै महिन्यात पाऊस सुरू झाला. त्यामुळे १७ टक्क्यांवर पोहोचलेले पवना धरणात पाणीसाठा होण्यास सुरुवात झाली. धरण क्षेत्रात पाऊस कायम असल्याने धरण निम्मे २० जुलैच्या दिवशी भरले होते. त्या महिन्याअखेरीस धरणातील पाणीसाठा ७५ टक्क्यांवर जाऊन पोहोचला. दोन ऑगस्टला पाणीसाठा ९० टक्के झाला होता.

दरम्यान, पवना धरण क्षेत्रात जोरदार पाऊस असल्याने ३ ऑगस्टपासून तीन दिवस १,४०० क्सुसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला होता. त्यानंतर पावसाचा जोर कमी झाल्याने विसर्ग बंद करण्यात आला. विश्रांतीनंतर पावसाची संततधार सुरू झाल्याने पाणीसाठा वाढीस सुरुवात झाली. १३ ऑगस्टला धरण ९६ टक्के भरले. पाऊस कमी असला तरी, धरणात साठा हळूहळू वाढू लागला.

#### आजपर्यंत एकूण 2,162 मिलिमीटर पाऊस...


» १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्युतगृहाऐवजी धरणाच्या सांडव्यातून १५ ते १७ ऑगस्ट असे तीन दिवस पाणी सोडण्यात आले. साठा वाढल्याने सोमवारी सायंकाळी पाचपर्यंत धरण ९९.७२ टक्के भरले होते. धरणात ८.४८ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. आज ६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्यामुळे धरण १०० टक्के भरले आहे. यावर्षी १ जून पासून आजपर्यंत एकूण २,१६२ मिलिमीटर पाऊस झाला आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरासह मावळमधील काही भागांचा तसेच एमआयडीसीच्या वर्षभराचा पाण्याची चिंता

## ... तर पोहचाल यशोशिखरावर!

### » डॉ. गोविंद कुलकर्णी : पीसीसीओईच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विद्यार्थी मित्रांनो तुम्ही अभियांत्रिकी विद्याशाखेत प्रवेश घेतला आहे. या चार वर्षाच्या काळात भरपूर कष्ट करा; त्यानंतर पुढील आयुष्यात तुम्ही यशोशिखरावर पोहोचाल याची खात्री बाळगा, असा संदेश पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना दिला..**



पीसीईटीच्या वतीने पीसीसीओईच्या २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षासाठी अभियांत्रिकी विद्या शाखेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ आयोजित केला होता. यावेळी उपस्थित विद्यार्थी व पालकांना तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम दोन सत्रांमध्ये आकुर्डी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर सभागृहात झाला. यावेळी डॉ. कुलकर्णी बोलत होते. कार्यक्रमास पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे उपसंचालक डॉ. निळकंठ चोपडे, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे, डॉ. संजीवनी सोनार, पीसीसीओईच्या आंतरराष्ट्रीय संबंध विभागाच्या अधिष्ठाता डॉ. रोशनी राऊत, डॉ. लीना शर्मा, डॉ. सोनाली पाटील, डॉ. राजीव नगरकर आदी उपस्थित होते.

#### अडचणींना सामोरे जा...

»डॉ. देसाई म्हणाले की, सुसंस्कारित अभियंते आणि देशाचे नागरिक घडविण्याचा वसा पीसीईटीच्या अंतर्गत संकुलातील शैक्षणिक संस्थांनी घेतला आहे. संस्कारीत अभियंते तयार करण्याचे काम पीसीसीओई मध्ये केले जात आहे. तुम्हाला मिळालेल्या संधीचे सोने करा. अडचणी अनेक प्रकारे येतात, परंतु त्या अडचणींना सामोरे जा. त्यातूनच तुम्हाला यश मिळेल. अडचणींचा सामना केल्याने धैर्य, खंबीरपणा निर्माण होऊन यशस्वी अभियंते म्हणून नावलौकिक मिळेल.

# पुणेकरांचे 2100 कोटी 'खड्ड्यात' !

## रस्ते दुरुस्तीची मलमपट्टी; खड्ड्यांचे शुक्लकाष्ट कायम

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या सहा वर्षांत रस्तेदुरुस्तीसाठी महापालिकेने तब्बल दोन हजार १०० कोटींचा खर्च केला आहे. त्यानंतरही रस्त्यांची दुरवस्था कायम असल्याने शहरातील सर्व रस्ते दुरुस्तीसाठी किमान एक हजार कोटींच्या निधीची आवश्यकता आहे. मात्र निधीची चणचण, अर्धवट रस्तेदुरुस्ती आणि रस्ते दुरुस्तीनंतर होणारी खोदाई या कारणांमुळे शहरातील रस्ते पुन्हा खड्ड्यात जाणार आहेत.**

त्यामुळे खड्ड्यांचे शुक्लकाष्ट कायम राहणार असून, रस्ते गुळगुळीत होतील, ही शक्यताही कमीच आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांत रस्ते दुरुस्तीसाठी चारशे कोटींच्या कामांना मंजुरी दिली आहे. हा खर्चही केवळ उधळपट्टी ठरणार आहे. महापालिकेच्या पथ विभाग, मलनिस्सारण, विद्युत विभागाबरोबरच मेट्रो मार्गिकेच्या कामासाठी रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर खोदाई करण्यात येते. याशिवाय खासगी, शासकीय आणि निमशासकीय कंपन्यांकडूनही सेवा वाहिन्या टाकण्यासाठी वारेमाप रस्तेखोदाई गेल्या काही वर्षांपासून होत आहे. पावसाळ्याचा कालावधी सोडला तर शहरातील रस्त्यांची सातत्याने खोदाई सुरूच असल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडत असून, रस्ते दुरुस्तीचे काम महापालिकेला सातत्याने हाती घ्यावे लागत असून रस्ते दुरुस्ती तात्पुरती मलमपट्टी ठरत आहे. गेल्या सहा वर्षांत महापालिकेने रस्ते दुरुस्तीसाठी दोन हजार १०० कोटी रुपयांचा खर्च केला आहे. मात्र, त्यानंतरही रस्त्यांची दुरवस्था कायम आहे. अपुरा निधी, रस्ते दुरुस्तीची कामे झाल्यानंतर पुन्हा होणारी रस्ते खोदाई, दुरुस्तीच्या कामांचा निकृष्ट दर्जा यामुळे रस्ते खड्ड्यात जात आहेत. महापालिकेच्या पथ विभागाला रस्ते दुरुस्तीसाठी यंदा चारशे कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. क्षेत्रीय स्तरावरही स्वतंत्र निधी असल्याने त्या माध्यमातूनही रस्ते दुरुस्तीची कामे केली जातात. यंदा भर पावसाळ्यात रस्ते दुरुस्तीची कामे करण्यात आली. रस्ते दुरुस्तीची कामे अशास्त्रीय पद्धतीने झाल्याचा प्रकारही पुढे आला होता. निधी मंजूर झाल्यानंतर संपूर्ण रस्त्याचे काम पथ विभागाकडून केले जात नाही. काही अंतरातच रस्ते दुरुस्त केली जाते. त्याचा फटका संपूर्ण रस्त्याला बसतो.



### शहरातील रस्त्यांची लांबी

शहरात एकूण १ हजार ३९८.६५ किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. यामध्ये १२ मीटरपेक्षा कमी रुंदीचे ९७०.८६ किलोमीटर, १२ ते १४ मीटर रुंदीचे ३१४ किलोमीटर, २४ ते ३० मीटर रुंदीचे ६०.५४ किलोमीटर, ३० ते ३६ मीटर रुंदीचे २९.९६ किलोमीटर, ३६ ते ६१ मीटर रुंदीचे २३.२९ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचा समावेश आहे. यातील डांबरी रस्त्यांची लांबी ९४४.१२ किलोमीटर एवढी, तर २१०.३९ किलोमीटर लांबीचे काँक्रीटचे रस्ते आहेत.

> शहरातील डांबरी रस्त्यांची दुरुस्तीसाठी किमान एक हजार कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. मात्र सततची रस्ते खोदाई होत असल्याने रस्त्यांची दुरवस्था होत आहे. त्यासाठी विभागात समन्वय आवश्यक आहे.
>
> **-व्ही. जी. कुलकर्णी,** मुख्य अभियंता पथ विभाग

# पुणे विभागात रेल्वेचा वाढणार वेग!

## चिंचवड ते खडकी स्थानकादरम्यान काम पूर्ण

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे विभागात रेल्वेच्या स्वयंचलित सिग्नल यंत्रणेचे काम प्रगतिपथावर आहे. चिंचवड ते खडकी स्थानकादरम्यान हे काम पूर्ण झाले असून, पुढील तीन महिन्यांत पुणे स्थानकांपर्यंत हे काम पूर्ण केले जाणार आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर गाड्यांचा वेग वाढणार आहे.**



> स्वयंचलित सिग्नल यंत्रणेत सिग्नलचे नियंत्रण फक्त धावत्या गाडीच्या हालचालीद्वारे होते. यात गाडीच्या पुढील सिग्नल १ किलोमीटर अंतरात आणि मागील सिग्नल १ किलोमीटर अंतरात गृहीत धरला जातो. त्यामुळे एकापाठोपाठ अनेक गाड्या एकाच वेळी धावू शकतात.
>
> **– डॉ. रामदास भिसे,** जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे

याचबरोबर एकाच वेळी अनेक गाड्या धावण्यास मदत होणार आहे. पुणे विभागातील मेगा ब्लॉक घेऊन रेल्वेने नुकतेच चिंचवड ते खडकी स्थानकांदरम्यान १०.१८ किलोमीटरचे स्वयंचलित सिग्नल यंत्रणेचे काम पूर्ण केले. या भागात आता ही यंत्रणा कार्यान्वित झाली आहे. यामुळे पुणे विभागातील लोणावळा ते खडकी हा ५४.३५ किलोमीटरचा भाग स्वयंचलित सिग्नलिंग क्षेत्र बनला आहे. खडकी ते पुणे या ६.२४ किलोमीटरच्या उर्वरित भागात ही यंत्रणा पुढील तीन महिन्यांत कार्यान्वित होईल. मुंबई ते लोणावळा या दरम्यान आधीच ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. चिंचवड ते पुणे विभागात स्वयंचलित सिग्नलिंग यंत्रणा सुरू केल्याने गाड्या चालण्याचा वेळ कमी होईल. याचबरोबर गाड्यांचा वेग वाढण्यास मदत होईल. हे काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक एक किलोमीटरच्या अंतरात एक गाडी लोहमार्गावर धावू शकते. ही यंत्रणा स्वयंचलित असून, त्यात मानवी हस्तक्षेप अजिबात नाही. या अद्ययावत यंत्रणेमुळे मानवी चुका टाळल्या जाणार असून, दुर्घटना घडण्याचा धोकाही कमी होणार आहे. या यंत्रणेत गाड्या आणि लोहमार्गांवर ऑक्झिलरी वॉर्निंग सिस्टीम ही प्रणाली बसविण्यात आली आहे. ती प्रणाली प्रत्येक सिग्नलवर गाडीचा सुरक्षित वेग निश्चित करेल. पिवळा दिवा ओलांडल्यानंतर गाडीचा वेग कमी करण्याची आणि मोटरमनने लाल दिव्याकडे दुर्लक्ष केल्यानंतर आपत्कालीन ब्रेक लागू करण्याची प्रक्रिया या प्रणालीद्वारे होईल.

# जमिनीला सोन्याचा भाव!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

करोना संकटानंतर देशातील प्रमुख महानगरांमध्ये जागांना मागणी वाढली आहे. निवासी प्रकल्प आणि व्यावसायिक प्रकल्पांसाठी जमिनीच्या मोठ्या व्यवहारांत या वर्षी वाढ झाली आहे. यंदा जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत ५९ मोठे व्यवहार झाले असून, दोन हजार १८ एकर जागेची विक्री झाली आहे. सर्वाधिक १७ व्यवहार मुंबईत झाले असून, पुण्यात पाच व्यवहार झाले आहेत. हे व्यवहार शेकडो कोटी रुपयांचे आहेत. मालमत्ता क्षेत्रातील सल्लागार संस्था 'अनारॉक'ने याबाबतचा अहवाल सोमवारी जाहीर केला. यानुसार, देशात जानेवारी ते ऑगस्टदरम्यान ५९ व्यवहार झाले. मागील वर्षी याच कालावधीत ५९ व्यवहार एकूण १ हजार ४३८ एकरचे झाले होते. यंदा पाच व्यवहार टाऊनशिप प्रकल्पांसाठी झाले असून, ते एकूण १ हजार १३६ एकरचे आहेत. चेन्नई, अहमदाबाद आणि लुधियानामध्ये या टाऊनशिप उभ्या राहत आहेत. निवासी प्रकल्पासाठी ३८ व्यवहार झाले आहेत. त्यात निवासी प्रकल्प २८३ एकर, भूखंड विकसन १५४ एकर, संमिश्र वापर ६२ एकर यांचा समावेश आहे. संमिश्र वापरासाठीचे ४ व्यवहार असून, ते नोएडा, गुरूग्राम, पुणे आणि बंगळुरूमध्ये झाले आहेत. चेन्नई, रायगड आणि गुरूग्राममध्ये १५४ एकरच्या भूखंड विकसनाचे ३ व्यवहार झाले आहेत. व्यावसायिक वापरासाठीचे १६.५ एकरचे ३ व्यवहार दिल्ली, नोएडा आणि गुरूग्राममध्ये झाले आहेत. बंगळुरूमध्ये उत्पादन प्रकल्पासाठी ३०० एकरचा व्यवहार झाला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा जमिनींचे मोठे व्यवहार वाढले आहेत. अहमदाबादमध्ये आकारमानानुसार सर्वात जास्त जमिनीचे व्यवहार झाले असून, त्याखालोखाल लुधियाना आणि बंगळुरूत झाले आहेत. निवासी प्रकल्पांसाठीच्या व्यवहारांची संख्या सर्वाधिक आहे,

# ... तर 'एनडीए'ला बिनशर्त पाठिंबा!

## आमदार बच्चु कडू : दिव्यांग कल्याण भिग दिव्यांगाच्या दारी अभियान

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'मेक इन इंडिया, 'मेड इन इंडिया' हे धोरण आहे. शेतकऱ्यांचा माल विदेशात गेला तर त्याला सफरचंदचा भाव मिळेल. त्यामुळे सरकारने आयात-निर्यात धोरणात स्पष्ट भूमिका घेतली. तर, एकही जागा न मागता एनडीएला पूर्ण ताकदीने पाठिंबा देवू असे प्रहारचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी सांगितले. तसेच कांद्याच्या निर्यातीवर केंद्र सरकारने लावलेले 40 टक्क्यांचे शुल्क चुकीचे असून त्याविरोधात आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला.**



चिंचवड येथे "दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी" या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुनाल खेमनार, पिंपरी महापालिका समाज कल्याण विभागाचे उपायुक्त अजय चारटणकर, विठ्ठल जोशी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट आदी उपस्थित होते.

### दिव्यांगांसाठी 5 टक्के निधी...

मुख्यमंत्री झाल्यानंतरही एवढा आनंद झाला नसता तेवढा आनंद दिव्यांग मंत्रालय झाल्यावर मला आनंद झाला. दिव्यांग मंत्रालय चिरकाल टिकणारे आहे. देशात कुठेच दिव्यांग मंत्रालय नाही हे फक्त महाराष्ट्रात आहे. वेदना असणाऱ्यांच्या पाठीशी उभा न राहता त्याच्या खिशातून पैसे काढणारे हे अफजलखान, इंग्रजांपेक्षा नालायक असतात. एक काळ असा आला पाहिजे की, अधिकारी असले पाहिजेत पण तक्रार करणारा कोणीच नसला पाहिजे याला प्रशासन म्हणतात. अधिकाऱ्याने एवढे चांगले, ताकदीने काम करावे की आयुष्यभर दिव्यांगाने आपला चेहरा बघितला पाहिजे. दिव्यांग कधी आत्महत्या करत नाही. थोडी ताकद दिली तर ऑलम्पिकपटूपेक्षा जास्त पदके दिव्यांग आणतील. पाच टक्के निधी दिव्यांगासाठी वाटप करणारे महाराष्ट्र एकमेव राज्य आहे. दिव्यांगांच्या ताकदीवर 82 शासन निर्णय काढल्याचेही ते म्हणाले.

कडू म्हणाले, कांदा नाही खाल्ला तर कोण मरणार नाही.

पण, शेतकऱ्यांचे नुकसान का करता. कांद्यावर निर्यात शुल्क लावण्याची गरज नव्हती. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबरची व्यवस्था तुम्ही आज करून ठेवताय एवढी नालायकी कशासाठी केली जात आहे. अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार कांद्याचे भाव वाढल्याने पडल्यामुळे असे केले जात आहे. सरकार नामर्द आहे.

---

## देशभक्तीपर गीताच्या रील स्पर्धेमध्ये अमन मासी प्रथम

### "लहरायेगा तिरंगा" : देशभरातील 150 कलाकारांचा सहभाग

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**स्वतंत्र भारताच्या अमृत महोत्सव निमित्ताने लहरायेगा तिरंगा या देशभक्तीपर गीतावर रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये देशभरातील १५० कलाकारांनी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता. उत्तर प्रदेश या राज्यातील अमन मासीने प्रथम क्रमांक पटकावला आहे.**



सामाजिक विषयावर लघुपट निर्मिती करून समाज प्रबोधनाचे काम करणाऱ्या करणाऱ्या पिंपरी चिंचवड शहरातील रेडबड मोशन पिक्चर्स या संस्थेच्या वतीने स्वतंत्र भारताच्या अमृत महोत्सव निमित्ताने लहरायेगा तिरंगा या शाळाबाह्य मुले, ऊसतोड कामगार, बाल मजदूर या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यासाठी लहरायेगा तिरंगा या गाण्याची निर्मिती नुकतीच करण्यात आली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील या गाण्याची दखल घेत या गाण्याची निर्मिती करणारे दिग्दर्शक सीए अरविंद भोसले यांना पत्र लिहून विशेष कौतुक देखील केलेले आहे. या देशभक्तीपर लहरायेगा तिरंगा गीतावर रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये देशभरातील १५० कलाकारांनी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत उत्तर प्रदेश येथील अमन मासी यांच्या ग्रुपने प्रथम पटकावत ११,१११ रोख रकमेचे पारितोषिक व स्मृतिचिन्ह पटकावले आहे. द्वितीय क्रमांक नवी दिल्ली येथील संजय मौर्या आणि टीम यांनी ७,७७७ रोख रक्कम व स्मृतिचिन्ह पटकाविले आहे. तृतीय पारितोषिक पंजाब येथील अनाया खन्ना हिने ५,५५५ व स्मृतिचिन्ह पटकाविले आहे. सर्वात जास्त लाईक मिळवणाऱ्या नवी दिल्ली येथील आकाश व इतर सह कलाकार यांना विशेष पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

### बालकलाकारांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव...

चिंचवड येथील पैस कला रंगमंच येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विजेत्यांची घोषणा करण्यात आली. तसेच या गाण्या मध्ये काम करणाऱ्या बालकलाकारांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संत साहित्याचे अभ्यासक प्रा. सपंत गर्जे, डॉ नितीन लोंढे, ग्रुज एन्टरप्राइजेस चे व्यवस्थापक प्रदीप पाटील, एस पी इंटरनॅशनल चे व्यवस्थापक पांडुरंग देशमुख, बोल्ट इंनोव्हेट चे संचालक सुनील कापसे, पल्लवी कापसे, दिग्दर्शक सीए अरविंद भोसले, झील या संस्थेचे श्रेयश देशपांडे, एपीएच संचालिका अभिनेत्री प्रज्ञा पाटील, अभिनेते रोहित पवार, वाको इंडिया किक बॉक्सिंग चे सेक्रेटरी संतोष म्हात्रे, व्यंगचित्रकार गणेश भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.

---

## मेट्रो प्रवाशांचे पार्किंगसाठी वेट अँन्ड वॉच!

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

गेल्या वर्षी सहा मार्चपासून पिंपरीतून फुगेवाडीपर्यंत धावणारी मेट्रो एक ऑगस्टपासून थेट शिवाजीनगर सिव्हिल कोर्ट स्थानकापर्यंत धावू लागली आहे. तेथून पूर्वेला पुणे स्टेशन, रूबी हॉल क्लिनिक स्थानक आणि पश्चिमेला कोथरूड वनाजपर्यंत जाता येत आहे. दररोज सरासरी ५० हजार प्रवासी लाभ घेत आहेत. शहराच्या वेगवेगळ्या भागातून स्वतःची दुचाकी वा चारचाकी वाहनांनी ते मेट्रो स्थानकापर्यंत येतात. मात्र, पिंपरीसह शहरातील सहाही मेट्रो स्थानकांच्या परिसरात वाहनतळ (पार्किंग) नसल्याने वाहने उभी करायची कुठे? असा प्रश्न पडत आहे. पुणे मेट्रोची स्वारगेट ते पिंपरी मार्गिका शहरात आहे. त्यावर पिंपरी-चिंचवड महापालिका भवन (पीसीएमसी), संत तुकारामनगर (वल्लभनगर), भोसरी (नाशिक फाटा), कासारवाडी, फुगेवाडी आणि दापोडी अशी सहा स्थानके आहेत. गेल्या सहा मार्चपासून पीसीएमसी ते फुगेवाडीपर्यंत मेट्रो धावत होती. तिचा उपयोग केवळ हौस म्हणून नागरिक करीत होते. आता एक ऑगस्टपासून पुण्यातील सिव्हिल कोर्ट स्थानकापर्यंत मेट्रो धावत आहे. तिथे उतरून वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गाने वनाजपर्यंत आणि रामवाडीच्या दिशेने रूबी हॉल क्लिनिक स्थानकापर्यंत जाता येत आहे. त्यामुळे शिवाजीनगर, सिव्हिल कोर्ट, पुणे रेल्वेस्थानक, बालगंधर्व, डेक्कन, गरवारे कॉलेज, नळ स्टॉप, आनंदनगर, कर्वेरोड, वनाज आदी स्थानकांवर उतरून पुण्यात विविध भागात जाणे शक्य झाले आहे. त्याचा लाभ सामान्य प्रवाशांसह विद्यार्थी, नोकरदार, पर्यटक घेऊ लागले असून मेट्रो प्रवासी संख्याही वाढली आहे. त्यातील बहुतांश जण दुचाकीने व हौस म्हणून येणारे चारचाकी वाहनांनी मेट्रो स्थानकापर्यंत येत आहेत. त्यांची वाहने उभी करण्यासाठी स्वतंत्र वाहनतळच नसल्याने गैरसोय होत आहे. महामार्गावर 'पार्किंग' पीसीएमसी स्थानक परिसरात मुंबई-पुणे महामार्गाच्या सेवा रस्त्यालगत मेट्रो मार्गाच्या पिलरच्या मध्ये वाहने उभी केली जात आहेत.

# प्रत्येकजण 'ज्येष्ठ नागरिक' होणार




**दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा केला जातो. त्या दिवशी काहीना काही उपक्रम विविध मंडळांतर्फे आयोजित केले जातात. ज्येष्ठ नागरिकांनी आपले आरोग्य कसे सांभाळावे, उतार वयात होणाऱ्या आजारांना कसे तोंड द्यावे, आपला वेळ सत्कारणी लावण्यासाठी त्यांना काय काय करता येईल,**

कुठले छंद जोपासावेत, आपली दिनचर्या कशी ठेवावी, आर्थिक नियोजन कसे करावे वगैरे विषयांतील तज्ज्ञांकडून मार्गदर्शनपार लेख लिहिले जातात आणि भाषणे केली जातात. हे सर्व अत्यंत महत्त्वाचे आणि उपयुक्त आहे, याबद्दल शंकाच नाही. पण ज्येष्ठांच्या तरुण पिढीकडून काय माफक अपेक्षा आहेत किंवा नवीन काळातील बदलते वास्तव लक्षात घेता त्यांना काय सांगावेसे वाटते, याबाबत मात्र क्वचितच ऊहापोह होतो. दोन पिढ्यांतील अंतरामुळे होणारा वाद किंवा संघर्ष ही बाब काही नवीन नाही. काही ज्येष्ठ मंडळी आपल्या हेकेखोर, हटवादी आणि विक्षिप्त वागणुकीमुळे कुटुंब आणि समजातील आदर गमावून बसतात. पण काही प्रकरणांत असे दिसून येते, की घरातील तरुण व्यक्ती वयस्क व्यक्तींशी फार कठोरपणे, काहीवेळा दुष्टपणे वागतात. त्यातच राहत्या जागा किंवा स्थावर मालमत्तांना जे अतोनात मोल आले आहे त्यामुळे माणुसकीच नष्ट होईल की काय, अशी रास्त भीती वाटू लागली आहे. तरुणांनी



ज्येष्ठांच्या शारीरिक, आर्थिक आणि मानसिक हतबलतेचा विचार करून त्यांना वागणूक द्यावी असे त्यांना नम्रपणे सुचवावेसे वाटते. वृद्धांची तरुणांकडून ऐषआरामाच्या साधनांची वा मानसन्मानाची अपेक्षा नसते, केवळ सहृदयतेने विचार करणेच अपेक्षित असते. आज सारे काही संगणकीकृत झाले आहे. सर्व व्यवहार ऑनलाइन चालतात. आजच्या वृद्ध पिढीला त्यासाठी आवश्यत कौशल्ये अवगत नसतात. त्यांच्या निवृत्तीच्या सुमारास संगणक युगाची सुरुवात झाली आणि बघता बघता त्याचा वेग इतका वाढला की आधीची पिढी अगदी निरक्षर म्हणावी अशी ठरली. त्यामुळे दोन पिढ्यांतील अंतराचे आयामच बदलले. त्यामुळे वृद्धांचे भांबावणे आपुलकीने समजून घेणे गरजेचे आहे. आजच्या तरुणांचा दिनक्रम फार दगदगीचा आणि तणावपूर्ण आहे. जीवनशैली अत्यंत खर्चिक, अशाश्वत, तणावपूर्ण आहे. त्यामुळे घरी आल्यानंतर त्यांना कोणाशी साधा संवाद साधणेही नकोसे वाटते. काही वेळा घरी येऊनही परत लॅपटॉपमध्ये डोके घालून बसणे क्रमप्राप्त ठरते. अशावेळी घरी असणाऱ्यांना प्रश्न पडतो की संवाद कधी आणि कसा साधावा? शिळोप्याच्या गप्पा सोडा किमान प्रापंचिक अडचणी सोडविण्यासाठी तरी घरातील तरुणांचा वेळ कसा मिळवावा? कारण काही अडचणी दूर करणे वृद्धांच्या आवाक्याबाहेरचे असते. तरुणांच्या अनुपस्थितीत घरात दिवसभर वृद्धांनीच सर्व गोष्टी सांभाळलेल्या असतात. अशावेळी त्यांनी काही विचारलेच, तर त्यांच्यावर चिडणे योग्य नाही. तरुण पिढी आठवडाभर दिवसरात्र कामात बुडालेली असते आणि पाश्चात्य देशांतील पद्धतीनुसार त्यांना विकेंड बाहेर जाऊन साजरा करायचा असतो. अशावेळी आठवडाभर घरात तरुणांच्या अनुपस्थित अडकून पडलेल्या व्यक्तींनी मोकळा श्वास कधी घ्यावा, याचाही विचार करणे गरजेचे आहे. कैक वर्षे प्रापंचिक कटकटींचा सामना करून त्यांनाही कंटाळा आलेला असतो. अशावेळी त्यांनाही 'वीकएन्ड'ची आवश्यकता आहे, असे तरुण पिढीला का वाटत नाही?

काही कुटुंबांमध्ये वृद्ध आई-वडिलाना सांभाळण्यावरून वाद विकोपाला गेलेले असतात. आता मुलगीदेखील माहेरच्या संपत्तीत हक्कदार झाल्यामुळे त्यात भर पडली आहे. काही प्रकरणांत अमुक एक तारखेला अमुक एक भावाने किवा बहिणीने आई-वडिलांना (किवा जो मागे राहिलेला असेल त्याला) सांभाळायचे, असे ठरलेले असते. त्यादिवशी कौटुंबिक अडचण, आजारपण, पाऊस-पाणी, प्रवासातील अडचणी कशाचाही विचार न करता, त्याच दिवशी त्यांची रवानगी केली जाते. मुलांचे महत्त्वाचे शैक्षणिक वर्ष, असेल तर वृद्ध व्यक्तीचे आजारपण म्हणजे त्या कुटुंबांवर आदळणारे फार मोठे संकट ठरते. त्या व्यक्तीच्या देखतच आल्या गेल्यांसमोर तसा उल्लेख वारंवार होत रहातो. आणि परीक्षेत अपेक्षित यश नाही मिळाले, तर आजन्म त्याचा उद्धार ठरलेला. अशावेळी आधीच गलितगात्र झालेल्या वृद्धांच्या हळव्या मनाला अपराधी भावनेमुळे काय वेदना होत असतील, याचाही विचार कोणी करत नाही. वृद्धत्वामुळे व्यक्तीच्या नकळत त्याच्या वागणुकीत अकालनीय बदल होतात. या बदलांना "नाटक" संबोधणे योग्य नाही.

## संपादकीय »

### पथ्य न करी सर्वथा..

***डॉक्टरांच्या पंचतारांकित परिषदांचे पुरस्कर्ते म्हणून औषध कंपन्या नकोत, हा निर्णय स्वागतार्हच; पण तो सुसंगत आहे का आणि अंमलबजावणी सक्षमपणे होऊ शकते का?***

गेल्या काही दिवसांत वैद्यकीय विश्वाविषयी दोन महत्त्वाचे निर्णय 'राष्ट्रीय वैद्यकीय आयोग' (नॅशनल मेडिकल कमिशन, पूर्वीचे 'मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया' ऊर्फ एमसीआय) या वैद्यकांच्या कथित नियामक यंत्रणेने घेतले. ही नव्या नावारूपातील संघटना २०२० साली अस्तित्वात आली. वैद्यकीय अभ्यासक्रम, वैद्यक क्षेत्र आदींचे नियंत्रण या नियामकाकडून अपेक्षित आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री हेच या नियामक यंत्रणेचे प्रमुख. म्हणजे सध्या मनसुख मांडविया यांच्याकडे या यंत्रणेचे सारथ्य आहे. नियमन हे कोणत्याही नियामक यंत्रणेचे घटनादत्त कर्तव्य असले तरी नियमन, अतिनियमन आणि त्यातील पळवाटा यांचे भान राखण्याइतकी सजगता आपल्या सरकारी यंत्रणांस असते याची खात्री बाळगावी असा इतिहास नाही. त्याचीच पुनरावृत्ती वैद्यकीय आयोगाच्या निर्णयांतून होत असेल तर त्याची चर्चा आवश्यक ठरते. आजच्या संपादकीयात आयोगाच्या पहिल्या निर्णयाबाबत.

**राजकारणात युवकांनी पुढे आले पाहिजे. हे सर्वच राजकीय पक्षांतील नेते मंडळी म्हणत असतात. परंतु एखाद्या युवा नेत्याला महत्त्वाच्या पदावर बसविण्याची वेळ येत असते तेव्हा त्यास मात्र ती संधी मिळवून दिली जात नाही. महत्त्वाची पदे नेहमी नेत्यांच्या घरात किंवा त्यांच्या नातेवाईकांना दिली जात असतात. तळागाळात कार्य करणारा युवा कार्यकर्ता मात्र कुठे तरी पक्षाचा तालुकाध्यक्ष किंवा शहराध्यक्ष बनत असतो.**

# ...गल्लीपर्यंतच्या घराणेशाहीकडे कधी पाहायचे?

एकाच तालुक्याचे अनेक अध्यक्ष, उपाध्यक्ष,जातीय समीकरणे जुळवून आणलेल्या विविध सेलचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संघटक यासारख्या विविध पदांवर त्याला समाधान मानावे लागत असते. या व्यतिरिक्त त्यास कोणतेही दुसरे महत्त्वपूर्ण पद दिले जात नाही. सर्वसामान्य जनतेतील जो युवा कार्यकर्ता व नेता असतो तो कार्यक्रमातून सतरंज्या उचलणे, खुर्च्यांची जुळवाजुळव करण्यापासून ते नेते, साहेब, कार्यक्रमात येईपर्यंत काम करत असतो. परंतु अशा धडपडणाऱ्या कार्यकर्त्याला एखाद्या जेमतेम एखाद्या बिनमहत्त्वाच्या पदापर्यंतच मजल मारू दिली जात असते. कार्यकर्ता असाच कुजविला जातो. अनुभव घेतलेले, अनेक वर्षांचा कालावधी गेलेले, अनेक पक्षांतील कार्यकर्ते पदाधिकारी मग पक्षाच्याच नावाने खडे फोडत असतात.

यावर कुणी अपवादांची उदाहरणे दाखवतील : एखाद्या धडपडणाऱ्या कार्यकर्त्यास पदापर्यंत नेले जाते.



राजकीय मतांची गोळाबेरीज म्हणून त्याचे घर दार व त्याचा संसार चांगला चालेल या दृष्टीने त्यास आर्थिक सक्षमही केले जात असते. पण सरपंच, आमदार, खासदार, मंत्री ही राजकीय प्रक्रियेतील महत्त्वाची पदे आहेत. ही पदे मिळवून देण्यासाठी कितपत प्रयत्न केले जातात? हे तर सोडाच, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचे सदस्य होण्यासाठीसुद्धा संधीची दारे उघडली जात नाहीत. सर्वसामान्य युवा नेत्याने व कार्यकर्त्याने निवडणूक लढविण्यासाठी जो आवश्यक पैसा असतो तो आणायचा तरी कुठून? म्हणून मग अर्थातच, सर्वसामान्य युवा नेत्याला संधी मिळतच नाही. युवा नेते म्हणून नेत्यांच्या घरातीलच घराणेशाहीतून उगवलेल्या नेत्याला आपला नेता मानावे लागते. आपापल्या गावात असे युवा नेते प्रबळ उमेदवार बनून जातात. निवडून आणायला इथल्याच बाकीच्या युवा नेत्यांकडून आणि कार्यकर्त्यांकडून कंबर कसली जात असते. नेत्यांच्या घरातील तसेच नातेवाईकांनाच संधी देण्यासाठी प्रयत्न केले जात असतात. हल्ली लोकशाहीवर राज्य करण्याची हुकूमत ही राजकीय घराणेशाहीच करत आहे. बाप झाला की मुलगा त्यांनतर नातवंडे पुढे येऊ लागली आहेत. 'परिवारवादा'च्या विरुद्ध कितीही भाषणे द्या, आजही देशात घराणेशाहीचे राजकीय अस्तित्व वाढतच चाललेले आहे. जनतेच्या समस्यांपेक्षा घराणेशाहीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी राजकारणात कसरत केली जाते, हे आजही दिसते आहे. व्यक्तिकेंद्रित राजकारणाच्या- म्हणजे हुकूमशाहीच्या दिशेने ही आपली लोकशाही घेऊन चालली आहे. हुकूमत ही कोणत्याही लोककेंद्री राजकारणासाठी घातकच असते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बळीराजाला मिळेना पीक विम्याचा आधार!

## वाळवा तालुक्यातील स्थिती : प्रशासनाची मदतीसाठी उदासीनता

। वाळवा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसाअभावी पिकांचे नुकसान होऊनही वाळवा तालुक्यातील बळीराजाला पीक विम्याचा आधार मिळेना झाला आहे. वारंवार या बाबत मदतीसाठी मागणी करूनही जिल्हा प्रशासन दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे खर्च करून पेरणी केलेल्या बळीराजाला नुकसानीची चिंता सतावत आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे तालुक्यातील शेतकरी नाराजीचा सूर ओढत आहेत.**



> पावसामध्ये बऱ्याच दिवसापासून खंड निर्माण झाला आहे. ऐतवडे बुद्रुक परिसरातील सुमारे 400 शेतकऱ्यांनी पिक विमा भरला आहे. पाऊस न झाल्यामुळे सोयाबीन, भुईमूग, भात या पिकाच्या उत्पादनामध्ये घट होऊन पिके हाताला लागतात का नाही, याबाबतीत शंका निर्माण झाली आहे.
>
> **- सौरभ पाटील,** माजी उपसरपंच, ऐतवडे बुद्रुक.

नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना पीक विमा संरक्षण दिले जाते. पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्याच्या उद्देशाने शासनाने ही योजना राबवली आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजना बंधनकारक असून बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. वाळवा तालुक्यात गेल्या २० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपासून पावसाने उघडीप दिली आहे. त्यामुळे पिके कोवळी असताना पाणी मिळणे अपेक्षित होते. ते मिळाली नाही. त्यामुळे आता कितीही पाऊस झाला तरी पिकांचे नुकसान टळणार नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पिकांची पेरणी केल्यानंतर होणारा खर्चाचा तोटा भरून काढण्यासाठी शेतकरी विम्याकडे अपेक्षेने बघत आहेत. मात्र तिथेही हाती निराशाच येत आहे.

वाळवा तालुक्यात ८ हजार ७८७ शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेसाठी सहभाग घेतला आहे. २ हजार ९९८ हेक्टर क्षेत्राचा या मध्ये समावेश होत आहे. पावसाचे प्रमाण नोंद करणाऱ्या स्टेशनमधून शासनाकडून माहिती घेतली जाते. त्यानंतर किती उत्पादन घेतले जाते, सध्या किती नुकसान होईल याचा अंदाज घेतला जातो. त्यानुसार पीक विम्याची रक्कम निश्चित केली जाते. मात्र या बाबत अद्याप कोणतीच कार्यवाही शासनस्तरावर सुरु नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे असून ते नाराजी व्यक्त करत आहेत.

### विमा कंपनी प्रतिनिधी नॉट रिचेबल

» पीक विम्याचा लाभ मिळावा म्हणून शासनाने टोल फ्री क्रमांक किंवा पीक विम्याचे अँड्रॉइड एप्लीकेशन उपलब्ध करून दिले आहे; त्यावर तक्रार करण्याचे आवाहन केले आहे. मात्र योग्य माहिती न भरल्यास तक्रार रद्द होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकरी ऑनलाईन तक्रारींकडे पाठ फिरवीत आहे. विमा कंपनीच्या तालुका प्रतिनिधीला शेतकरी संपर्क करत आहेत. मात्र विमा कंपनी प्रतिनिधी नॉट रिचेबल असल्याचे समोर येत आहे. प्रतिनिधीलाच या बाबत गांभीर्य नसल्याचे शेतकरी म्हणत आहेत.

> अग्रीम पीक विमा योजनेची मदत मिळावी, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. सलग २१ दिवस पाऊस न पडल्याने सोयाबीन, भुईमूग पिकांच्या उत्पादनात ५० टक्केपेक्षा अधीक घट येणार आहे. यासाठी सरसकट शेतकऱ्यांना ५० टक्के अग्रीम पीक विमा परतावा मिळावा, अशी आमची मागणी आहे.
>
> **- शहाजी गायकवाड,** संस्थापक, लोकनेते राजारामबापू पाटील स्वयंसहायता शेतकरी गट, ऐतवडे बुद्रुक.

# निर्णय अपेक्षा पूर्ण करणारा नाही

## सरकारने कांद्याला 4 हजार रुपयांचा भाव द्यावा

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**कांद्यावरील निर्यातशुल्काच्या वादात आता शरद पवारांनी उडी घेतलीय. केंद्र सरकारने कांद्याला 4 हजार रुपयांचा भाव द्यावा अशी मागणी पवारांनी केलीय. 2410 रुपयांचा दर शेतकऱ्यांना परवडणारा नाही. यात त्यांचा उत्पादन खर्च निघणार नसल्याची भूमिका पवारांनी घेतलीय. कांद्यावरील निर्यातशुल्क कमी करण्याची मागणीही शरद पवार यांनी केली आहे.**



दरम्यान शरद पवार म्हणाले की, केंद्र सरकारने निर्यात शुल्कावर 40% कर लादल्याने नाशिकच्या सर्व बाजारसमित्यांमध्ये कांदा खरेदी बंद आहे. खरेदी बंद असल्यामुळे कांदा तीनशे रुपयांनी घसरलाय. कांद्याचा भाव 2000 ते 2400 च्या दरम्यान आला आहे. महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक झाल्यानंतर केंद्र सरकारच्या निर्यातावर तोडगा काढण्यासाठी राज्यातील सर्वच मंत्री कामाला लागले आहेत. एकिकडे कृषीमंत्री धनंजय मुंडे हे दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांच्या भेटीवर गेले आहेत, तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जपान दौऱ्यावर असतानाही केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्याशी संपर्क केला आहे. त्यांच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न फडणवीस यांनी केला आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार केंद्र सरकारने 2 लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विटरच्या माध्यमातून माहिती दिली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे केंद्र सरकार महाराष्ट्रातून 2 लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करणार आहे. तसेच त्यासाठी नाशिक आणि अहमदनगर येथे दोन खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. केंद्र सरकार 2410 प्रतिक्विंटल या दराने कांदा खरेदी करेल.

### सरकारकडून कांदा खरेदीचा निर्णय

» महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक झाल्यानंतर केंद्र सरकारच्या निर्यावर तोडगा काढण्यासाठी राज्यातील सर्वच मंत्री कामाला लागले आहेत. एकिकडे कृषीमंत्री धनंजय मुंडे हे दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांच्या भेटीवर गेले आहेत, तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जपान दौऱ्यावर असतानाही केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्याशी संपर्क केला आहे. त्यांच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न फडणवीस यांनी केला आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार केंद्र सरकारने 2 लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# मंत्रिमंडळ विस्तारात आम्हाला संधी मिळावी

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

राज्यात एकनाथ शिंदे यांचे सरकार स्थापन होऊन आता वर्षभरापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. परंतु शिवसेनेतून एकनाथ शिंदे बाहेर पडल्यानंतर नेमके काय ठरले होते? या गोष्टींच्या चर्चा अधुनमधून होत असतात. त्यावर आता आमदार आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. तर दुसरीकडे आरपीआय आठवले गटाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी मंत्रीपदाची मागणी केली आहे. दरम्यान केंद्रीय मंत्री रामदास आठवले म्हणाले की,एकनाथ शिंदे यांच्यासोबतच्या नेत्यांना मंत्रिपद मिळाले. अजित पवार यांच्यासोबतच्या नेत्यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र आमच्या पक्षाच्या नेत्यांना मंत्रिपद देण्यात आलेले नाही. अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. पण तरिही शिवसेना आणि भाजपचे नेते अजूनही वेटिंगवर आहेत. अशात रिपाइंचे नेते रामदास आठवले यांनीही मंत्रिपदावर दावा केला. रामदास आठवले म्हणाले की,अजित पवार, एकनाथ शिंदे यासोबतच्या सगळ्यांना मंत्रिपद मिळालं. पण आम्हाला मंत्रिपद मिळालं नाही. आमची मागणी आहे की, आम्हालाही मंत्रिपद द्यावे. देवेंद्र फडणवीस यांनी पुढे होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात मंत्रिपद द्यावे म्हणून सांगितले. मात्र अजित पवार यांचा विस्तार होईल समावेश होईल. हे आम्हाला ही माहिती नव्हते. पण तरिही आमची मागणी कायम आहे. आरपीआयला मंत्रिपद मिळावे. शिवाय अजित पवार यांच्या युतीत येण्याने भाजपच्या मतांवर काहीही परिणाम होणार नाही. बच्चू कडू म्हणाले की, मी शिंदे साहेबांसोबत येण्यासाठी अट घातली. ही अट म्हणजे दिव्यांग मंत्रालय होत असेल तर मी तुमच्यासोबत येतो, अशी होती. देवेंद्र फडणवीस यांना हे मी स्पष्टपणे सांगितले आणि त्यांनी त्याला होकार दिला.

# राम मंदिरात 600 किलो वजनी नर्मदेश्वराची स्थापना होणार !

## ओंकारेश्वरहून अयोध्येत आणले जात आहे शिवलिंग

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेशातील ओंकारेश्वरमधून 600 किलो वजनाचे शिवलिंग अयोध्येत आणले जात आहे. 5 दिवसांत 1000 किलोमीटरचा प्रवास करून 23 ऑगस्टला शिवलिंग अयोध्येत पोहोचेल. शिवलिंग 4 फूट उंच आहे. ते नर्मदा नदीच्या काठी सापडले, म्हणून नर्मदेश्वर महादेव म्हणून ओळखले जाते. आतापर्यंत ओंकारेश्वरजवळील बिलोरा खुर्द येथील नजर निहाल आश्रमात ते ठेवण्यात आले होते. श्री राम मंदिर परिसरातच त्याची स्थापना होणार असल्याची चर्चा आहे.**






मात्र, राम मंदिर ट्रस्टकडून याबाबत अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही. श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सदस्य डॉ. अनिल मिश्रा म्हणाले, "शुक्रवारी 18 ऑगस्ट रोजी शिवलिंगाचे पूजन केल्यानंतर ती प्रतिष्ठा यात्रा निघाली. 5 दिवसात एक हजार किमीहून अधिक प्रवास करून यात्रा अयोध्येला पोहोचणार असून 23 ऑगस्टला हे शिवलिंग रामजन्मभूमी न्यासच्या स्वाधीन करण्यात येणार आहे. अनिल मिश्रा म्हणाले, राम मंदिर उभारणीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. शिवलिंगाची स्थापना कुठे होणार? त्याचा निर्णय ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय घेतील. ते 22 ऑगस्टला अयोध्येत पोहोचणार आहेत.शुक्रवारी सकाळी 8 वाजता श्रीश्री 1008 अवधूत नर्मदानंद बापजी यांनी वेदमंत्रांचा उच्चार करून शिवलिंगाला दूध, दही आणि पाण्याने अभिषेक करून अयोध्येकडे रवाना केले. मध्य प्रदेशच्या पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री उषा ठाकूर यांनीही शिवलिंगाच्या पूजेत सहभाग घेतला. यानंतर प्रतिष्ठा यात्रेला हिरवी झेंडी दाखवण्यात आली.

### परकोटे येथे स्थापना होईल

» ही यात्रा उज्जैन, बिओरा, शिवपुरी, कानपूरमार्गे अयोध्येला पोहोचत आहे. अवधूत नर्मदानंद बापजी यांनी दिलेल्या माहितीनुसार, राम मंदिराच्या मूर्तीभोवती बांधल्या जाणाऱ्या सुमारे 14 फूट रुंद तटबंदीच्या 6 मंदिरांपैकी एका मंदिरात ओंकारेश्वराच्या शिवलिंगाची स्थापना केली जाणार आहे. ही आपल्या प्रदेशासाठी भाग्याची गोष्ट आहे. श्रीरामाच्या या पवित्र जन्मभूमीत स्थापन करण्यात येणारे शिवलिंग ओंकारेश्वर तीर्थक्षेत्रातून निवडण्यात आले आहे.

ही यात्रा उज्जैन, बिओरा, शिवपुरी, कानपूरमार्गे अयोध्येला पोहोचत आहे. अवधूत नर्मदानंद बापजी यांनी दिलेल्या माहितीनुसार, राम मंदिराच्या मूर्तीभोवती बांधल्या जाणाऱ्या सुमारे 14 फूट रुंद तटबंदीच्या 6 मंदिरांपैकी एका मंदिरात ओंकारेश्वराच्या शिवलिंगाची स्थापना केली जाणार आहे. ही आपल्या प्रदेशासाठी भाग्याची गोष्ट आहे. श्रीरामाच्या या पवित्र जन्मभूमीत स्थापन करण्यात येणारे शिवलिंग ओंकारेश्वर तीर्थक्षेत्रातून निवडण्यात आले आहे.अवधूत नर्मदानंद बापजी यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी यापूर्वी जम्मू ते अयोध्या या राष्ट्र गौरव पदयात्रा आणि राष्ट्रधर्म विजय यात्रेत भाग घेतला आहे. यादरम्यान त्यांनी श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांची भेट घेतली.

# आसाममध्ये बहुपत्नित्वावर बंदीची शक्यता

## सरमा यांनी प्रस्तावित कायद्यावर मागवल्या सूचना

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आसाममध्ये एकापेक्षा जास्त विवाहांवर बंदी घालण्यासाठी कायदा आणण्याची तयारी सुरू आहे. राज्याचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी याप्रकरणी लोकांकडून सूचना मागवल्या आहेत. त्यांनी सोमवारी (21 ऑगस्ट) ट्विटरवरील एका पोस्टमध्ये लोकांना बहुपत्नित्वावर बंदी घालण्याच्या प्रस्तावित कायद्यावर सूचना देण्याचे आवाहन केले आहे.**



### बालविवाहावर नवीन कायदा

» सीएम सरमा फेब्रुवारी 2023 मध्ये म्हणाले होते की आमची भूमिका स्पष्ट आहे, आसाममध्ये बालविवाह थांबला पाहिजे. बालविवाहविरोधात नवा कायदा आणण्याबाबत आम्ही चर्चा करत आहोत. 2026 पर्यंत, आम्ही बालविवाहविरूद्ध नवीन कायदे आणण्याचा विचार करत आहोत, ज्यामध्ये तुरुंगवासाची शिक्षा दोन वर्षांवरून 10 वर्षांपर्यंत वाढवली जाईल.

30 ऑगस्टपर्यंत लोक त्यांच्या सूचना पाठवू शकतात, असे त्यांनी सांगितले.गृह आणि राजकीय विभागाच्या प्रधान सचिवांनी याबाबत नोटीस बजावली आहे. त्यात म्हटले आहे की लोक ईमेल आणि पोस्टद्वारे सूचना पाठवू शकतात. या प्रस्तावित कायद्यासाठी राज्य सरकारने विशेष समितीही स्थापन केली होती.नोटीसनुसार, राज्य विधिमंडळ बहुपत्नित्वावर बंदी घालण्यासाठी कायदा करण्यास सक्षम आहे. विवाह समवर्ती यादीत येतो, त्यामुळे केंद्र आणि राज्ये दोघेही त्यावर कायदा करू शकतात. नोटीसमध्ये म्हटले आहे की इस्लामच्या संदर्भात न्यायालयाने एकापेक्षा जास्त पत्नी असणे हा धर्माचा अत्यावश्यक भाग नाही असे म्हटले आहे. नोटीसनुसार, पत्नींची संख्या मर्यादित करणारा हा कायदा धर्म पाळण्याच्या अधिकारात हस्तक्षेप करत नाही. हे समाजकल्याण आणि सुधारणांच्या कक्षेत येते. त्यामुळे एकपत्नित्वाला मान्यता देणारा हा कायदा कलम 25 चे उल्लंघन करत नाही.यापूर्वी 6 ऑगस्ट रोजी आसाम सरकारने स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीने या कायद्याबाबत आपला अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर केला होता. त्यानंतर या आर्थिक वर्षात या विषयावर कायदा आणणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली होती.

# हिमाचलमध्ये पुढच्या 96 तासांसाठी अलर्ट

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

उत्तराखंडमधील टिहरी जिल्ह्यातील चंबा येथे सोमवारी भूस्खलनात 4 महिन्यांच्या बाळासह 4 जणांचा मृत्यू झाला. ढिगाऱ्याखाली दबलेल्या कारमधून त्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. टिहरीचे एसपी नवनीत सिंग भुल्लर यांनी सांगितले की, आतापर्यंत चार मृतदेह सापडले असून आणखी एका बेपत्ता व्यक्तीचा शोध सुरू आहे. डेब्रिज साचल्यामुळे नवीन टिहरी-चंबा रस्ता बंद झाला. उत्तराखंड, डेहराडून, टिहरी, पौरी, बागेश्वर, चंपावत, नैनिताल आणि उधमसिंगनगर या सात जिल्ह्यांमध्ये आजही अतिवृष्टीचा इशारा हवामान खात्याने जारी केला आहे. दुसरीकडे, हिमाचलमध्ये पुढील 96 तासांत मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. राज्यात पावसामुळे आतापर्यंत 8099 कोटी रुपयांच्या सरकारी आणि खासगी मालमत्तेचे नुकसान झाले आहे.छत्तीसगडमध्ये गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत होता, मात्र आता तो खंडित होणार आहे. हवामान विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, आजपासून पावसाचा जोर कमी होईल. मात्र, चार ते पाच दिवसांनी पुन्हा चांगला पाऊस होण्याची शक्यता आहे. सध्या तापमानात वाढ झाल्याने आर्द्रतेचा लोकांना त्रास होऊ शकतो.मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर, चंबळ आणि सागर विभागात पुढील 2 ते 3 दिवस मान्सून प्रणाली सक्रिय राहील. त्यामुळे काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार पाऊसही पडू शकतो.

# राखीला धडा शिकवल्याशिवाय शांत बसणार नाही!



राखी सावंत कधी शांत बसेल असे चित्र दिसणे हे अवघड आहे. ती सतत तिच्या वेगवेगळ्या गोष्टींमुळे चर्चेत असते. राखीनं लग्न केलं ही तिच्या चाहत्यांसाठी धक्कादायक गोष्ट होती. एका महिन्याच्या आतच राखीच्या लग्नावरुन वादाला सुरुवात झाल्याचे दिसून आले. तिच्या पतीनं आदिलनं आता काही वादग्रस्त गोष्टी सांगितल्या आहेत.नेहमीच बातमीमध्ये राहण्याची कला राखीला साधली आहे. कधी ती तिच्या अतरंगी फॅशनमुळे, स्टाईलमुळे चर्चेत येते तर कधी काहीही बोलून नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेण्याची कामगिरी ती प्रभावीपणे पार पाडते. काही महिन्यांपूर्वी राखीनं तिचा पती आदिल दुर्रानीवर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर आदिलला पोलिसांनी अटकही केली होती. यावर आदिलनं राखीला जशास तसे उत्तर दिले आहे.आदिलनं काल प्रेस कॉन्फरन्स घेऊन राखीवर आरोप केले आहेत. राखीवर मी जे आरोप केले आहेत त्याचे पुरावे माझ्याकडे आहेत. राखीनं माझ्याशी लग्न केलं पण तिनं रितेशसोबतही संबंध ठेवल्याचे आदिलनं म्हटले आहे. तिनं माझ्याविषयी जे काही सांगितले आहे त्यात तथ्य नाही. राखी स्वताला सिंगल आहे असे सांगते. रितेशच्या लग्नाचा व्हिडिओ माझ्याकडे आहे असे आदिलनं म्हटले आहे.आदिलनं तो व्हिडिओ मीडियाला दाखवला आहे. याशिवाय त्यांच्या लग्नाचे सर्टिफिकेटही माध्यमाच्या प्रतिनिधींना दाखवले आहे. राखीनं रितेशपासून घटस्फोट घेतलेला नाही. तिनं माझ्याशी खोटं बोलून फसवलं. आणि घटस्फोट न घेताच माझ्यासोबत लग्न केलं. माझ्याकडे राखी आणि आदिलच्या त्या पाच क्लिप्स आहेत ज्यात ते दोघेही एका हॉटेलमध्ये असल्याचे दिसून येते.मला काही करुन त्या व्यक्तिनं केलेल्या आरोपांवर उत्तर द्यायचं आहे. वेळ पडल्यास मी मोदींकडे जाऊन दाद मागेल पण राखीला धडा शिकवणारच. अशी भूमिका आदिलनं घेतली आहे.

# तमाशाचं स्वरूपच बदललंय

रसिकांच्या मागणीवरून तमाशाचे स्वरूपच बदलले. सवाल-जवाब, छक्कड चालत नाही. आजच्या पोरांना मॉडेल लागते. आपली तमाशाकला, लोककला, शाहिरी जिवंत ठेवण्यासाठी महाराष्ट्रातील रसिकांनी पुढाकार घ्यावा, अशी भावना राष्ट्रपतिपदक विजेत्या ज्येष्ठ तमाशा कलावंत मंगला बनसोडे यांनी व्यक्त केली.याप्रसंगी त्यांनी काळजाला भेदून जाणारी ‘पोटासाठी नाचते मी, पर्वा कुणाची,’ ही लावणी सादर केली. यावेळी अनेकांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या. वाटेगाव (ता. वाळवा) येथील क्रांतिवीर बर्डे गुरुजी स्मारकामध्ये राज्यातील पहिल्या शाहिरी लोककला संमेलनाच्या उद्‌घाटन समारंभात त्या बोलत होत्या.अण्णा भाऊ साठे यांच्या सूनबाई श्रीमती सावित्री साठे, नातू सचिन साठे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. भारत पाटणकर, माजी सभापती रवींद्र बर्डे, प्रा. डॉ. बाबूराव गुरव, ज्येष्ठ शाहीर अंकल सोनवणे, शाहीर शीतल साठे, महेंद्र रोकडे प्रामुख्याने उपस्थित होते.शाहीर शीतल साठे यांनी ‘माझी मैना’ हे अण्णा भाऊंचे छक्कड, तसेच ‘जागा हो, जागा शाहिरीच्या मिठाला, गीत सादर केले. प्रारंभी अण्णा भाऊ साठे शिल्पसृष्टी व अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकामध्ये पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. मंगला बनसोडे म्हणाल्या, माझे पती रामचंद्र बनसोडे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे स्नेही होते. ते अण्णा भाऊंकडून कथानक घ्यायचे. त्यातून आम्ही फकिरा, कृष्णाकाठचा फरारी, आवडी, डोंगरची मैना अशी वगनाट्ये बसविली. ती राज्यातील रसिकांनी डोक्यावर घेतली. त्याचे सारे श्रेय अण्णा भाऊंना आहे. डॉ. भारत पाटणकर यांनी राज्यातील पहिले शाहिरी, लोककला संमेलन वाटेगावमध्ये घेण्यामागची भूमिका मांडली. ते म्हणाले, “सध्या लोककला लुप्त होत आहेत. जात्यावरच्या ओव्या, मोटेवरची, हादग्याची गाणी, झिम्मा-फुगडीतील गीते बंद झाली आहेत. आपणास त्यांचा शोध घेऊन ती पुन्हा आणावी लागतील. आपणास लोककला ही आजच्या जीवनाची कला बनवावी लागेल. मंगलाताईंची पोटासाठी नाचते मी ही लावणी लोककलेच्या शोकांतिकेचे आर्त रूप आहे.प्रा. डॉ. बाबूराव गुरव म्हणाले, “आज आपण क्रांतिकारी पाऊल टाकत आहोत. येत्या पाच-दहा वर्षांत पुन्हा महाराष्ट्र उभा राहील. शाहिरांनी आपला ‘डीएनए’ काय आहे, याचा शोध घ्यावा.” सचिन साठे म्हणाले, “या संमेलनातून राज्यास एक नवा संदेश दिला जाणार आहे. दुसरे संमेलन अधिक व्यापक आणि मोठे करू.” यावेळी महेंद्र रोकडे यांनी, आता घरात बसून चालणार नाही, पुन्हा एकदा बिन्नीवर धाव घ्यावी लागेल, असे आवाहन केले. स्वागताध्यक्ष, माजी सभापती रवींद्र बर्डे म्हणाले, “सध्या ‘मनुस्मृती’चे उदात्तीकरण केले जात असताना आपणास गप्प बसून चालणार नाही. आम्ही प्रतिवर्षी हा लोकजागर वाटेगावमध्ये घेऊन अण्णा भाऊंची जन्मभूमी साहित्यपंढरी करू.” कामगार नेते जयंत निकम यांनी सूत्रसंचालन केले. योगेश साठे यांनी आभार मानले.





# जॅकलिनने तिरंगा फडकवला

रविवारी न्यूयॉर्कमध्ये सुरुवात झाली. फेडरेशन ऑफ इंडिया असोसिएशनने या परेडचे आयोजन केले होते. ज्यामध्ये बॉलिवूड अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस हिने देखील सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाशी संबंधित जॅकलिनचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे, ज्यामध्ये ती तिरंगा फडकावताना दिसत आहे. अभिनेत्री व्यतिरिक्त, परेडमध्ये गुरु श्री श्री रविशंकर, अभिनेत्री सामंथा रुथ प्रभू आणि न्यूयॉर्क शहराचे महापौर एरिक ॲडम्स देखील उपस्थित होते. एएनआय या वृत्तसंस्थेने शेअर केलेल्या या व्हिडिओमध्ये जॅकलीन परेडमध्ये न्यूयॉर्कच्या रस्त्यावर तिरंगा झेंडा फडकवताना दिसत आहे. जॅकलिनने लाल रंगाचा ब्लेझर आणि पांढऱ्या रंगाचा ड्रेस घातला आहे. जॅकलिनला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने चाहते तेथे जमले होते. अनेकांच्या हातात तिरंगाही दिसतो. अभिनेत्रीला पाहताच तिच्या चाहत्यांनी जल्लोष सुरू केला. जॅकलिनने हात हलवून त्याचे स्वागत केले. जॅकलिनच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर ती लवकरच सोनू सूद आणि विजय राज यांच्यासोबत फतेह चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन वैभव मिश्रा यांनी केले आहे. यासोबतच जॅकलीन क्रॅक या क्राईम ॲक्शन चित्रपटातही दिसणार आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत विद्युत जामवाल आणि अर्जुन रामपाल देखील मुख्य भूमिकेत आहेत.

# शेट्टीने आयुष्मानकडून घेतले नृत्याचे धडे

आयुष्मान खुराना सध्या त्याचा आगामी चित्रपट 'ड्रीम गर्ल-2'च्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान, चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अभिनेता टीव्ही रिॲलिटी शो इंडियाज गॉट टॅलेंटमध्ये दिसला, जिथे त्याने शोची जज शिल्पा शेट्टीसोबत नृत्य केले. यादरम्यान शिल्पाने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये, आयुष्मान शिल्पा शेट्टीसह ड्रीम गर्ल 2 मधील दिल का टेलिफोन 2.0 गाणे ऐकताना दिसत होता. यादरम्यान अभिनेत्री पिवळ्या रंगाच्या पोशाखात खूपच सुंदर दिसत आहे. त्याच वेळी, आयुष्मान काळ्या टी-शर्ट, काळ्या पॅंटसह काळ्या प्रिंटेड जॅकेटसह आहे. दोघांनी एकत्र मस्त डान्स मूव्हज केले. व्हिडिओ शेअर करताना शिल्पाने कॅप्शनमध्ये लिहिले सोबत डान्स लेसन. आयुष्मान खुराना आणि अनन्या पांडे स्टारर चित्रपट 'ड्रीम गर्ल 2' या महिन्याच्या 25 तारखेला रिलीज होणार आहे.

# आशिया कपमध्ये भारतीय संघ सर्वात वयस्कर!

## » आशिया कपमध्ये भारतीय संघातील 7 खेळाडू 30 पार

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया कपसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात वयस्कर संघ आहे. भारतीय खेळाडूंचे सरासरी वय २९ वर्षे आहे. कर्णधार रोहित शर्मा (36 वर्षे 113 दिवस) हा भारतीय संघातील सर्वात वयोवृद्ध खेळाडू आहे. स्पर्धेतील इतर संघांमध्ये फक्त बांगलादेशचा कर्णधार शकीब अल हसन (36 वर्षे 141 दिवस) रोहितपेक्षा मोठा आहे.**




नेपाळचा गुलशन झा हा 16व्या आशिया चषक स्पर्धेतील सर्वात तरुण खेळाडू ठरणार आहे. 22 च्या सरासरी वयासह, त्यांचा संघ स्पर्धेतील सर्वात तरुण संघ देखील आहे. आशिया चषक स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या 4 संघांचे विश्लेषण आपण पाहुयात सर्व संघांमध्ये सहभागी असलेल्या खेळाडूंच्या वयाचा लेखाजोखा यात आहे. श्रीलंका आणि अफगाणिस्तानचे संघ सोमवारपर्यंत जाहीर झाले नव्हते. त्यामुळे त्यांचा यात समावेश नाही.टीम इंडियाच्या 7 खेळाडूंनी वयाची 30 ओलांडली आहे. रोहित व्यतिरिक्त विराट कोहली (34 वर्षे), रवींद्र जडेजा (34 वर्षे), सूर्यकुमार यादव (32 वर्षे), मोहम्मद शमी (32 वर्षे), केएल राहुल (31 वर्षे) आणि शार्दुल ठाकूर (31 वर्षे) यांचे वय 30 हून अधिक आहे. खेळाडू गेले. तिलक वर्मा संघातील सर्वात तरुण खेळाडू आहे. तो फक्त 20 वर्षांचा आहे. संघाच्या फलंदाजी, गोलंदाजी आणि अष्टपैलू युनिटमध्ये 30 वर्षांपेक्षा जास्त वयाचे खेळाडू आहेत.पाकिस्तान संघाचे सरासरी वय 26 वर्षे आहे. संघातील 4 खेळाडूंनी वयाची 30 वर्षे ओलांडली आहेत. यामध्ये फखर जमान (33), इफ्तिखार अहमद (32), तय्यब ताहीर (30) आणि मोहम्मद रिझवान (31) यांनी तिशी ओलांडली आहे. संघातील सर्वात सिनियर खेळाडू फखर जमान आहे. तो 33 वर्षांचा आहे, तर नसीम शाह (20 वर्ष) सर्वात लहान आहे.

### बांगलादेशचा कर्णधार सर्वात वयस्कर

» सरासरी वयाच्या बाबतीत बांगलादेश तिसऱ्या क्रमांकावर आहे. संघाचे सरासरी वय 26 वर्षे आहे. कर्णधार शकिब अल हसन हा आशिया चषकाच्या या हंगामातील सर्वात वयस्कर खेळाडू आहे. तो 36 वर्षांचा आहे, तर शरीफुल इस्लाम (22 वर्ष) संघातील सर्वात तरुण खेळाडू आहे. संघातील दोन खेळाडूंनी वयाची 30 वर्षे ओलांडली आहेत.

### नेपाळचा संघ सर्वात तरुण

» आशिया चषक स्पर्धेत प्रथमच सहभागी होणारा नेपाळ हा चालू हंगामातील सर्वात तरुण संघ आहे. संघात फक्त करण केसी 31 वर्षांचा आहे. तो संघातील सर्वात वयस्कर खेळाडू आहे. तसेच गुलशन झा (17 वर्षे) हा संघातील सर्वात तरुण खेळाडू आहे.

# फिडे विश्वचषकाच्या अंतिम फेरीत!

## » जगातील नंबर-3चा केला पराभव!

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदाने फिडे विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्याने सोमवारी रात्री जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या फॅबियानो कारुआनाचा टायब्रेकमध्ये 3.5-2.5 ने पराभव केला. ही स्पर्धा अझरबैजानमधील बाकू येथे खेळवली जात आहे. हा पराक्रम करणारा प्रज्ञानंदा हा दुसरा भारतीय खेळाडू ठरला आहे.**



यापूर्वी हा विक्रम विश्वनाथन आनंदच्या नावावर होता. अंतिम फेरीत त्याचा सामना जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा खेळाडू मॅग्नस कार्लसनशी होणार आहे. टाय ब्रेकरमध्ये खेळाडूच्या मागील सामन्यांच्या स्कोअरच्या आधारे टाय ब्रेकचा स्कोअर तयार केला जातो.

अधिक गुण मिळविणाऱ्याला विजेता घोषित केले जाते.आर. प्रज्ञानंदा आणि मॅग्नस कार्लसन यांच्यात नेहमीच निकराची लढत होते. मॅग्नस कार्लसन हेड टू हेड पुढे आहे. या दोन्ही खेळाडूंमध्ये आतापर्यंत 19 सामने झाले आहेत. यापैकी कार्लसनने 7 आणि प्रज्ञानंदाने 5 जिंकले आहेत. 6 सामने अनिर्णित राहिले. टाटा स्टील चेस चॅम्पियनशिपमध्ये त्याने कार्लसनसोबत शेवटचा सामना ड्रॉ केला होता.

गुरुवारी प्रज्ञानंदाने सडन डेथ टायब्रेकमध्ये भारताच्या अर्जुन इरिगाईसीचा 5-4 असा पराभव करून उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले होते. प्रज्ञानंदाने पुढच्या वर्षीच्या उमेदवारांच्या स्पर्धेत आधीच जागा निश्चित केली आहे. अमेरिकेचा ग्रँडमास्टर हिकारू नाकामुरा याला टायब्रेकरमध्ये पराभूत करून प्रज्ञानंदाने FIDE विश्वचषक स्पर्धेतील सर्वात मोठा अपसेट खेचला.

फायनलमध्ये प्रवेश केल्यानंतर प्रज्ञानंदा म्हणाला, "मला या स्पर्धेत मॅग्नसविरुद्ध खेळण्याची अपेक्षा नव्हती, कारण मी केवळ त्याच्याविरुद्ध अंतिम फेरीत खेळू शकलो." मला फायनलमध्ये पोहोचण्याची अपेक्षा नव्हती. मी फक्त माझे सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करेन आणि पुढे काय होते ते पाहीन.

चेन्नईस्थित प्रज्ञानंदाने 2018 मध्ये प्रतिष्ठित ग्रँडमास्टर विजेतेपद मिळवले होते. ही कामगिरी करणारा तो भारतातील सर्वात तरुण खेळाडू आणि त्यावेळी जगातील दुसरा सर्वात तरुण खेळाडू होता.

### 10व्या वर्षी आंतरराष्ट्रीय मास्टर बनला

» प्रज्ञानंदा हा भारतातील तामिळनाडू राज्यातील आहे. प्रज्ञानंदाचा जन्म 10 ऑगस्ट 2005 रोजी चेन्नई येथे झाला. त्याचे वडील रमेशबाबू तामिळनाडू स्टेट कॉर्पोरेशन बँकेत शाखा व्यवस्थापक म्हणून काम करतात, तर आई नागलक्ष्मी गृहिणी आहेत. प्रज्ञानंद 2016 मध्ये वयाच्या 10 व्या वर्षी सर्वात तरुण आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ मास्टर बनला. बुद्धिबळातील दिग्गज विश्वनाथन आनंद यांनी सोशल नेटवर्किंग साइट 'एक्स'वर पोस्ट केले की, प्रज्ञानंदा अंतिम फेरीत पोहोचला आहे. त्याने टायब्रेकमध्ये फॅबियानो कारुआनाचा पराभव केला आणि आता त्याला मॅग्नस कार्लसनचे आव्हान असेल. खूप छान.

# गायकवाडने केले रिंकूचे कौतुक

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

टीम इंडियाचा सलामीवीर ऋतुराज गायकवाडने दुसऱ्या सामन्यानंतर रिंकू सिंहचे कौतुक केले. तो म्हणाला, 'रिंकूची एक खास गोष्ट म्हणजे तो पहिल्या चेंडूपासून आक्रमण करत नाही, तो नेहमी स्वत:ला वेळ देतो. परिस्थिती कोणतीही असो, तो नेहमी स्थितीचे आकलन करतो आणि नंतर हल्ला करतो. रिंकूने आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या T20 सामन्यात पदार्पण केले आणि त्या सामन्यात त्याची फलंदाजी आली नाही. युवा खेळाडू रिंकूने दुसऱ्या सामन्यात 21 चेंडूत नाबाद 38 धावा केल्या. रिंकूने 180.95 च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या. त्याच्या खेळीत 2 चौकार आणि 3 षटकारांचा समावेश होता. त्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत गायकवाड म्हणाला, 'यंदाच्या आयपीएलपासून रिंकू सर्वांचा आवडता बनला आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये त्याने बॅटने बरीच परिपक्वता दाखवली. भावी खेळाडू असो किंवा फिनिशर बनू इच्छिणारा कोणीही असो, तो रिंकू सिंहकडून खूप काही शिकू शकतो.रिंकू सिंहने पदार्पणाच्या डावात 180.95 च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या. पदार्पणाच्या डावात सर्वात जलद धावा करण्याच्या बाबतीत तो दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. या यादीत पहिले नाव आहे सूर्यकुमार यादव याचे. यादवने 2021 मध्ये इंग्लंडविरुद्धच्या पदार्पणाच्या डावात 183.87 च्या स्ट्राइक रेटने 57 धावा केल्या होत्या. विशेष म्हणजे या दोन्ही खेळाडूंना पदार्पणाच्या सामन्यात फलंदाजीची संधी मिळाली नाही. दोघांनीही आपापल्या दुसऱ्या सामन्यात पहिला डाव खेळला.'खरं सांगायचं तर नेतृत्वाची भूमिका ही खूप गुंतागुंतीची गोष्ट आहे असं मला वाटतं. एकावेळी एकाच खेळावर लक्ष केंद्रित करा असे माही भाई नेहमी सांगतात. फक्त वर्तमानात जगा, भविष्याची काळजी करू नका. लोक माझ्याबद्दल काय म्हणतात याची मला पर्वा नाही. मी सोशल मीडिया पाहणारा आणि माझ्याबद्दल कोणी काय बोलतो ते ऐकणारा नाही.